# श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ,

१, ना. ठा. मार्ग, न्यु मरिन लाईन्स्, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

**A+ Grade (CGPA of 3.27)**

Website : www.sndt.ac.in  Email : specialcell@sndt.ac.in

Phone : +91 22 22031879  Ext. No. : 1292, 1217

**विशेष कक्ष**


जावक क्र. विशेष कक्ष/अ-०४/२०२५-२६/ ४८७ .  दि. ०५/०८/२०२५

**परिपत्रक :**

विषय : पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेशामध्ये आरक्षणाची अंमलबजावणी करणेसंबंधात अनुसरावयाची कार्यपध्दती...

संदर्भ : विद्यापीठ परिपत्रक क्र. विशेष कक्ष/अ-०४/२०२५-२६/४२, दि. २४/०७/२०२५

महोदय/महोदया,

विद्यापीठ अनुदान आयोग/केंद्र शासन व महाराष्ट्र राज्य शासन यांचे निर्देश/मार्गदर्शक तत्त्वे/शासन निर्णय/तरतूदींअन्वये, विद्यापीठातील पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेशामध्ये आरक्षणाची अंमलबजावणी करणेसंबंधात उपरोक्त संदर्भीय परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे ;

१) विद्यापीठातील पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेशामध्ये आरक्षणाची अंमलबजावणी करणेसंबंधात विशेष कक्षाच्या उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी. याव्यतिरीक्त पीएच.डी. अभ्यासक्रमाचे प्रवेश निश्चित करण्याची उर्वरित कार्यपध्दती, विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग / पीएच.डी. सेल / परिक्षा व मुल्यमापन विभाग तसेच विद्यापीठातील वरीष्ठ प्राधिकरणाकडून निर्धारीत/विहित केल्याप्रमाणे राहील.

२) विशेष कक्षाच्या उपरोक्त संदर्भीय परिपत्रकातील क्र. १ नुसार, प्रत्येक महाविद्यालय/विभाग स्तरावर अध्यक्ष, तीन सदस्य व मागासवर्ग प्रतिनिधी यांचा समावेश असलेली 'प्रवेश समिती' गठीत करून प्रवेश नियंत्रित करणेबाबत सूचित केले आहे. याव्यतिरीक्त प्रवेश समितीमध्ये युजीसी/केंद्र व राज्य शासन यांचे कायदे/मार्गदर्शक तत्त्वे किंवा विद्यापीठामार्फत अन्य प्रतिनिधीची तरतूद करण्यात येत असल्यास त्यांचाही समावेश प्रवेश समितीमध्ये करण्यात यावा.

३) विशेष कक्षाच्या उपरोक्त संदर्भीय परिपत्रकानुसार, प्रत्येक गाईडने/संबंधीत विषयाच्या विभागप्रमुखांमार्फत परिपत्रकासोबतचे **प्रपत्र-अ परिपूर्ण अद्ययावत करून त्याची 'मुळ प्रत' विद्यापीठाच्या पीएच. डी. सेलला** तात्काळ जमा करावी असे कळविले आहे.

यासंदर्भात आणखी असेही सूचित करण्यात येते की, **सदर प्रपत्र-अ ची एक प्रत विशेष कक्षाला (specialcell@sndt.ac.in या मेलवर) पाठवावी.** तसेच सदर प्रपत्र-अ सोबत प्रत्येक मान्यताप्राप्त गाईडकडे नोंदणी झालेल्या विद्यार्थीनींची (भरलेल्या जागांची) खालील कागदपत्रं देखील जोडून (पीएच.डी. सेल व विशेष कक्षाला) पाठवावीत ;

अ) विद्यार्थीनींचे नोंदणी पत्र (Letter of Registration for Ph.D. Programme),

ब) मागासवर्गीयांच्या जागेवर नोंदणी केलेल्या विद्यार्थीनींचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र,

क) विद्यार्थीनीच्या नावात बदल झाला असल्यास, त्याबाबतचे विद्यापीठाचे पत्र.

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त सूचनांचे अनुपालन करावे, कळावे.

आपला,

(डॉ. विलास नांदवडेकर)
**कुलसचिव**

**प्रती,**
मा. प्राचार्य/संचालक/प्रभारी/विभागप्रमुख,
विद्यापीठाचे पदव्युत्तर विभाग, सेंटर, इंस्टिटयूट,
विद्यापीठ संचलित व संलग्न महाविद्यालये, नोंदणीकृत संस्था, महाराष्ट्र राज्य.
श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ, मुंबई